उपनिबंधक,सहकारीसंस्था,डोंबिवली,यांचे कार्यालय

तर्टेप्लाझा,अनेक्स शीतल,गांधीनगर,डोंबिवली (पूर्व) ता.कल्याण जिल्हाठाणे.

जा क्र उपनि/डोंबिवली/बी-२/पुर्नविकास/ २८/सन २०२३
दिनांक - ०६/०४/२०२३.

वाचावे :- १.संस्थेचे चेअरमन/सेक्रेटरी या कार्यालयास दिनांक ५/०४/२०२३ रोजी प्राप्त झालेले पत्र.
२.मा.महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक: सगृयो २०१८/प्र.क्र. ८५/१४-स, सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, दिनांक ०४ जुलै २०१९.
३. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९(२)(ब) मधील तरतूद

ज्याअर्थी, नव रोहीणी को-ऑप हौसिंग सोसायटी लि.प्लॉट नं.४३/४,टिळक विद्यामंदिर रोड,डोंबिवली (पूर्व) ता. कल्याण जि.ठाणे ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील तरतूदीनुसार नोंदणीकृत संस्था असून तीचा नोंदणी क्रमांक टिएनएन/केएलएन/एचएसजी/(टिसी)/६३१/१९८५-८६ दिनांक १४/०२/१९८६ असा आहे व ती या कार्यालयाचे अधिकार कक्षेत येते आणि,

ज्याअर्थी संस्थेचे चेअरमन/सेक्रेटरी यांनी सदरची प्रक्रिया पूर्ण करून अंतिम निर्णय घेण्यासाठी या कार्यालयास प्राप्त दिनांक ५/०४/२०२३ रोजीच्या अर्जान्वये सदर संस्थेची पूर्नविकासाबाबतची विशेष सर्वसाधारण सभा शासन निर्णय सगृयो २०१८/प्र.क्र. ८५/१४-स, सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, दिनांक ०४ जुलै २०१९ मधील अटी शर्तींची पूर्तता करून विकासकामाची अंतिम निवड करण्यासाठी या कार्यालयामार्फत प्राधिकृत अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याची संस्थेने विनंती केलेली आहे. सदरची बाबत विचारात घेता सदर शासन निर्णयातील तरतूदीनूसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९ (२)(ब) मधील तरतूदीनूसार सदर सभेला उपस्थित राहून सभेतील कामकाजाबाबत अहवाल सादर करण्यासाठी प्राधिकृत अधिकाऱ्याची नियुक्ती करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, वरील परिस्थिती विचारात घेता पुढीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

-: आदेश :-

शासन निर्णय सगृयो २०१८/प्र.क्र. ८५/१४-स, सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, दिनांक ०४ जुलै २०१९ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानूसार मी दिनेश चंदेल,उपनिबंधक सहकारी संस्था डोंबिवली ता कल्याण जि. ठाणे नव रोहीणी को-ऑप हौसिंग सोसायटी लि.प्लॉट नं.४३/४,टिळक विद्यामंदिर रोड,डोंबिवली (पूर्व) ता. कल्याण जि.ठाणे या संस्थेच्या पुर्नविकासाबाबत विशेष सर्वसाधारण सभेला उपस्थित राहून त्यासंदर्भातील सविस्तर अहवाल सादर करण्यासाठी श्री.श्रीकांत पाटील, सहकारी अधिकारी (प्रथम श्रेणी) यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे. त्यांनी सदर सभेला उपस्थित राहून सदर सभेच्या इतिवृत्ताच्या प्रति व सी डी सह अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सदरचा आदेश मी माझे सही व शासन मुद्रेसह आज दिनांक ०६/०४/२०२३ रोजी दिला असे.

ठिकाण:- डोंबिवली
दिनांक :- ०६/०४/२०२३.

(दिनेश चंदेल)
उपनिबंधक
सहकारी संस्था,डोंबिवली.

प्रत :-
१)श्री.श्रीकांत पाटील, सहकारी अधिकारी (प्रथम श्रेणी) संलग्न उपनिबंधक सहकारी संस्था डोंबिवली
२/- यांनी नव रोहीणी को-ऑप हौसिंग सोसायटी लि.प्लॉट नं.४३/४,टिळक विद्यामंदिर रोड,डोंबिवली (पूर्व) ता. कल्याण जि.ठाणे या संस्थेच्या विशेष सर्वसाधारण सभेला हजर राहून कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

<u>प्रत माहितीसाठी</u>-

सदरचा आदेश मी माझे सही व शासन मुद्रेसह आज दिनांक ०५/०४/२०२३ रोजी दिला असे.

ठिकाणः- डोंबिवली
दिनांक :- ०५/०४/२०२३.

(दिनेश चंदेल)
उपनिबंधक
सहकारी संस्था,डोंबिवली.

प्रत :-
१)श्री.श्रीकांत पाटील, सहकारी अधिकारी (प्रथम श्रेणी) संलग्न उपनिबंधक सहकारी संस्था डोंबिवली
२/- यांनी नव रोहीणी को-ऑप हौसिंग सोसायटी लि.प्लॉट नं.४३/४,टिळक विद्यामंदिर रोड,डोंबिवली (पूर्व) ता. कल्याण जि.ठाणे या संस्थेच्या विशेष सर्वसाधारण सभेला हजर राहून कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

प्रत माहितीसाठी-

१) चेअरमन/सेक्रेटरी, नव रोहीणी को-ऑप हौसिंग सोसायटी लि.प्लॉट नं.४३/४,टिळक विद्यामंदिर रोड,डोंबिवली (पूर्व) ता. कल्याण जि.ठाणे
२/- यांनी प्राधिकृत अधिकारी यांचेशी संपर्क साधून विशेष सर्वसाधारण सभेची तारीख निश्चित करावी. तसेच प्राधिकृत अधिकाऱ्यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर इमारतीच्या पुर्नविकासासंदर्भात या कार्यालयाकडून ना हरकत प्रमाणपत्र देण्यांत येईल.

उपनिबंधक
सहकारी संस्था, डोंबिवली